नि.फौ.ख.क्र. १३३/२०१९
सरकार वि. श्रावणकुमार वगैरे
निशाणी क्र. ११

**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – बजरंग परसराम जैस्वाल
वय – ४० वर्ष, व्यवसाय – शेती
राहणार – घोरपड रोड, कामठी, जिल्हा – नागपूर.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता एस.व्ही. रामटेके यांच्यातर्फे**

१. आज रोजी न्यायालयात हजर असलेल्या दोन्ही आरोपींना मी ओळखतो. एक आरोपी आज रोजी गैरहजर आहे. घटना सन २०१९ मध्ये आमच्या घोरपड येथील शेतीत अंदाजे दुपारी ४.०० वाजताच्या सुमारास घडली होती. त्यावेळी मी व माझ्या काकाचा मुलगा सचीन शेताला लागून असलेल्या धु–यामध्ये गुरे चारत होतो. आमचे तोंड गुरांकडे होते. त्यावेळी अचानक तिन्ही आरोपी आमच्या मागून आले व कु–हाड व काठीने आम्हा दोघांवर हमला केला. सदर कु–हाड माझ्या डोक्यावर लागली होती व मला तीन टाके लागले होते. सचीनच्या हातापायाला काठी लागली होती. त्यानंतर आम्ही दोघेही पोलीस स्टेशनला पळालो. तेथे मी आरोपींविरुध्द फिर्याद दिली. तेथून पोलीसांनी आम्हाला सरकारी दवाखाना, कामठी येथे उपचारासाठी नेले. त्यानंतर आम्हाला सुचनापत्र देवून घरी पाठविण्यात आले. आता मला फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१२** देण्यात येते. आता मला छापिल फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही नाही. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१३** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पंकज यादव यांच्यातर्फे.**

२. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र.१ व २ हे माझे नातेवाईक आहेत. आमचे व आरोपींच्या शेतामध्ये एक दुसरे शेत राजा शिंदे यांचे आहे. हे म्हणणे खरे आहे की आमच्या व

आरोपींच्या वस्तीतील जागा मोजणीसाठी अर्ज केलेला आहे. साक्षिदार स्वतःहून सांगतो की आरोपींनी मोजनी होवू दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या शेतासमोर मिल आहे, जेथे मजुर काम करतात. हे म्हणणे खरे आहे की माझ्या शेताला लागून माझे घर आहे, ज्यात माझे कुटुंब राहतो. हे म्हणणे खरे आहे की माझ्या घराला लागून मामा बिहारी यांचे लॉन आहे, जेथे सेक्युरीटी गार्ड असतात. हे म्हणणे खरे आहे की माझ्या घरासमोरील रोड वाहता आहे, जेथे लोकांचे जाणे येणे सुरु असते. हे म्हणणे खरे आहे की माझ्या शेतासमोरील पडीत जागेत इतर लोकांची गुरे चरायला येतात. हे म्हणणे खरे आहे की माझ्या शेताला काट्याचे कुंपन केलेले आहे.

३. हे म्हणणे खरे नाही की मी घटनेच्या दुस–या दिवशी घटनेबाबत फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की आरोपींनी माझ्या विरुध्द केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की छापील फिर्याद मध्ये काय लिहीलेले आहे हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की आम्ही आरोपींची गुरे आमच्या शेतात वारंवार येवून नासनुस करतात त्यामुळे त्यांना कांजी हाउस येथे ठेवले होते. हे म्हणणे खरे आहे की मालमत्तेची विभागणी होण्यापूर्वी आमची व आरोपींची मालमत्ता एकत्रात होती. हे म्हणणे खरे आहे की वाटनीनंतर आमच्यामध्ये वाद सुरु होता. हे म्हणणे खरे नाही की माझ्या डोक्याला जखम मी शेतात पडल्यामुळे दगड लागून झाली आहे. घटनेच्या वेळी मिलमध्ये मजुर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मी सांगितल्याप्रमाणे घटना झाली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी माझ्या विरुध्द केस केल्यामुळे मी आरोपींविरुध्द खोटी केस केली. हे म्हणणे खरे आहे की आरोपी क्र.१ हा आर्मी मधून सेवानिवृत्त झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपींकडे गुरे नाहीत. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**नाकारला**
**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

सही/–

**(रा.र. शेरेकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.

ठिकाण –कामठी
दिनांक –३०/०९/२०२३

नि.फौ.ख.क्र. १३३/२०१९
सरकार वि. श्रावणकुमार वगैरे
निशाणी क्र. ११

**निशाणी १७ वरील दिनांक १२/१०/२०२३ रोजीच्या आदेशानुसार**

**फेरतपास सरकार तर्फे सरकारी अभियोक्ता एस.व्ही. रामटेके यांच्या तर्फे**

४. ज्या काठी व कु–हांड ने आरोपींनी मला व सचिनला मारले होते ते दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला काठी व कु–हांड दाखविली, याच काठी व कु–हांडने आरोपींनी मला व सचिनला मारहाण केली होती. काठी व कु–हांड यांना अनुक्रमे **आर्टिकल–अ व ब** देण्यात येते.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पंकज यादव यांच्यातर्फे.**

५. हे म्हणणे खरे आहे की कु–हांड प्रत्येक शेतक–याकडे असते. हे म्हणणे खरे नाही की काठी आर्टिकल–अ सहजरित्या उपलब्ध असते. हे म्हणणे खरे आहे की गायी व म्हशी चारविण्यासाठी शेतकरी काठीचा उपयोग करतात. हे म्हणणे खरे आहे की घोरपड गावात भरपूर शेत आहे व भरपूर शेतकरी राहतात. हे म्हणणे खरे आहे की कु–हांड बाजारात सहजरित्या उपलब्ध असते. हे म्हणणे खरे नाही की आर्टिकल–अ व ब मी पोलीसांना दिले. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

सही/–

ठिकाण –कामठी
**(रा.र. शेरेकर)**
दिनांक –११/०१/२०२४
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.